**वाचले**

१) मा.आयुक्तसो यांचा दिनांक १६/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.सा.प्र.वि/०४/कावि/ १५८९/२०२४
दिनांक : १७/१२/२०२४

**विषय - कर्मचारी बदलीबाबत**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने खालील लिपिक संवर्गातील कर्मचा-यास त्यांचे नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या विभागामध्ये बदलीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र | कर्मचारी नावं व पदनाम | सध्याचा विभाग | बदलीचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | गोसावी आकाश प्रदिप | जिजामाता रुग्णालय | आरोग्य मुख्य कार्यालय |

उपरोक्त पदस्थापनेच्या अनुषंगाने सर्वसाधारण निर्देश :

१. उपरोक्त कर्मचा-यास बदलीच्या विभागात रुजू होणेकामी तात्काळ कार्यमुक्त (Stand Released) करणेत येत असून, त्यांनी बदली दिलेल्या विभागात दिनांक १८/१२/२०२४ पर्यंत रुजू होऊन, रुजू अहवालाची एक प्रत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी. उपरोक्त कर्मचा-यांना संबंधीत शाखाप्रमुखांनी स्वतंत्रपणे कार्यमुक्त करणेची आवश्यकता नाही.
२. उपरोक्त कर्मचा-यांचे आदेशाचे दिनांकापर्यंतचे गोपनीय अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविणेची संबंधित शाखाप्रमुखांनी दक्षता घ्यावी.
३. बदली रद्द करणेबाबत कोणतेही प्रस्ताव सादर करु नये. बदली दिलेल्या विभागात रुजू न होता विनापरवाना गैरहजर राहणे, परस्पर रजेवर जाणे अथवा बदली रद्द होणेबाबत बाहय दबाव आणल्यास त्याची गंभीरपणे दखल घेऊन शिस्तभंगाची कार्यवाही करणेत येईल याची संबंधित कर्मचा-यांनी नोंद घ्यावी.
४. लेखा विभागाने उपरोक्त कर्मचा-याचे माहे **डिसेंबर - २०२४** चे वेतन, त्यांचे बदली झालेल्या विभागातूनच अदा केले जाईल याची दक्षता घ्यावी.
५. बायोमेट्रीक थंम्ब इंम्प्रेशननुसार ३ लेट बाबतची कार्यवाही कार्यमुक्त आदेशाच्या दिनांकापर्यंत करुन तसा दाखला संबंधित कर्मचा-याचे अंतिम वेतन प्रमाणपत्रा सोबत स्थानांतरण झालेल्या विभागाकडे सादर करणेची जबाबदारी पुर्वीच्या विभागाची राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद उपरोक्त कर्मचा-यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति- संबधित कर्मचारी
प्रत- १. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. सामान्य प्रशासन टेबल क्र- २२ ४. सामान्य प्रशासन विभाग- संगणक कक्ष ५.पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ. ६.पिं.चिं. मनपा सेवकाची सहकारी पतसंस्था ७. सबंधित विभाग

**उप आयुक्त (सा.प्र.वि)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८